Enigma post event article

Maharashtra times

7 / 9/16



# 'एनिग्मा'त युपीजीची बाजी

लढाई म्हटलं की त्याची तयारी आली आणि लढा जिंकण्यासाठी संघात उत्तम योद्धे हवेतच. ८५० कार्यकर्ते, १०८ समिती सदस्य, ७६ विभागप्रमुख आणि ७ कोअर मेम्बर्स अशी मोठी टीम यंदाच्या 'एनिग्मा' फेस्टमध्ये कार्यरत होती. 'द अनफेअर वॉर-फेअर' अशी थीम असलेल्या या फेस्टमध्ये पोदारच्या या योद्ध्यांकडे फेस्टमध्ये युद्धभूमी तयार करण्याचं आव्हान होतं. मुंबईतल्या सुमारे पन्नास कॉलेजांच्या टीम्सनी यंदाच्या 'एनिग्मा'त आपला सहभाग नोंदवला. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टचा मीडिया पार्टनर होता.

मुंबईतील युपीजी कॉलेजने यंदाच्या 'एनिग्मा'त सर्वोत्तम कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. एनएम आणि सोमैया कॉलेजच्या टीम्सनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला.

फेस्टिवलचे सगळे इव्हेंट्स वेळेत आणि जल्लोषात पार पाडण्यात टीम एनिग्मा पूर्णपणे यशस्वी ठरली. तीनही दिवस सुरक्षितता ते सेलेब्रिटी मॅनेजमेंट उत्तम प्रकारे पार पडलं. फेस्ट यशस्वी होण्यासाठी प्रिन्सिपल, मार्गदर्शक शिक्षिका आणि पोदारचे इतर शिक्षक यांचं मोठं पाठबळ होतं. त्यामुळेच दरवर्षीप्रमाणे यंदाचा फेस्टिवल सुपरहिट झाला असं पोदारच्या विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आलं.

महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

'एनिग्मासारख्या कार्यक्रमांत सहभाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना मोलाचा अनुभव मिळतो. त्याचा त्यांना भविष्यात खूप फायदा होतो. अशा कार्यक्रमांसाठी कॉलेज नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभं राहतं', असं प्रिन्सिपल डॉ. शोबना वासुदेवन यांनी सांगितलं. 'एनिग्मा हा फेस्ट विद्यार्थ्यांचाच विद्यार्थ्यांसाठी असलेला फेस्ट आहे. दरवर्षी एनिग्मामध्ये विद्यार्थी खूप मजा करतात आणि त्या आठवणींबरोबर इव्हेन्ट मॅनेजमेंटचे धडेही शिकतात', असं टीचर इन चार्ज वृषाली कर्णेरी यांनी सांगितलं.

- अमेय मालशे, आदेश पुरंदरे
कॉलेज क्लब रिपोर्टर